रेशीम विकास अधिकारी (श्रेणी-१), महाराष्ट्र रेशीम सेवा, गट-ब (राजपत्रित) या पदावर सरळसेवेने नियुक्तीबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**वस्त्रोद्योग विभाग**
**शासन आदेश क्र. सपववि-४००२५/१२/२०२५-DESKSERICULTURE**
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक :- २३ जुलै, २०२६

वाचा :-
१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र.सीटीआर-३५२२/प्र.क्र.१२१/२०२२/२९, दि.२५.०८.२०२५.
२) सामान्य प्रशासन विभाग-शासन निर्णय क्रमांक ,परिवी-२७१५.क्र.प्र /३०२ /कार्या-८, दि.२२ जून,२०२१.
३) सामान्य प्रशासन विभाग,अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०२०/ प्र.क्र.४९/ कार्या-१२, दि.१४ जुलै,२०२१.

**शासन आदेश :-**

रेशीम विकास अधिकारी (श्रेणी-१), महाराष्ट्र रेशीम सेवा, गट-ब (राजपत्रित) या संवर्गातील पदावर सरळसेवेने नियुक्ती करण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने संदर्भाधीन क्र. १ येथील दि.२५.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये शिफारस केलेल्या उमेदवारांपैकी खालील तक्त्यामध्ये नमूद उमेदवारांची रेशीम विकास अधिकारी (श्रेणी-१), महाराष्ट्र रेशीम सेवा, गट-ब (राजपत्रित) या पदावर, ते प्रत्यक्ष रुजू होतील त्या दिनांकापासून, सातव्या वेतन आयोगानुसार वेतन मॅट्रिक्समधील वेतनस्तर एस-१६ (₹४४,९००-१,४२,४००) मध्ये, महाराष्ट्र नागरी सेवा (परीविक्षाधीन कालावधी) नियमांनुसार दोन वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करण्यात येत असून, त्यांची पदस्थापना खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

| गुणवत्ता क्रमांक | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग | नियुक्तीचे ठिकाण / कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | श्री. रविंद्र नेताजी कोरे | इ.मा.व | जिल्हा रेशीम कार्यालय, अमरावती |
| ३ | श्री.नितीन रामेश्वर मुंडे | भ.ज-ड | जिल्हा रेशीम कार्यालय, सांगली |

२. सदर उमेदवारांची नेमणूक खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :-**

१) उमेदवाराने या शासन आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत नियुक्तीच्या पदावर रुजू होण्यासाठी संचालक (रेशीम), रेशीम संचालनालय, नागपूर यांच्या कार्यालयात आवश्यक त्या सर्व मूळ कागदपत्रांसह हजर राहावे. तथापि, अपरिहार्य कारणास्तव विहित कालावधीत हजर राहणे शक्य नसल्यास, उमेदवाराने कालावधी वाढवून देण्याची विनंती शासनाकडे करावी. सदर विनंती शासनाने गुणवत्तेच्या आधारे मान्य केल्यास, मंजूर करण्यात आलेल्या वाढीव कालावधीत उमेदवाराने हजर राहणे आवश्यक राहील. विहित अथवा शासनाने मंजूर केलेल्या वाढीव कालावधीत उमेदवार हजर न झाल्यास, त्यांची नियुक्ती आपोआप रद्द करण्यात येईल.

२) उमेदवाराची नियुक्ती ही सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २२ जून, २०२१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार त्यांनी पदाचा कार्यभार स्वीकारल्याच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी राहील. सदर परिविक्षाधीन कालावधीत उमेदवाराची कामगिरी समाधानकारक नसल्यास अथवा त्यांची वर्तणूक शासकीय सेवेस अयोग्य असल्याचे आढळल्यास, संबंधित नियमांनुसार त्यांची सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

३) संबंधित उमेदवाराने हिंदी व मराठी भाषा परिक्षा अगोदरच उत्तीर्ण केली नसेल किंवा सदर भाषा परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर यासंबधी असलेल्या नियमानूसार भाषा परिक्षा व वेळोवेळी विहित केलेल्या इतर परिक्षा विहित नियमानुसार व विहित कालावधीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

४) संबंधित उमेदवारांनी शासनमान्य एम.एस.-सी.आय.टी. (MS-CIT) परीक्षा उत्तीर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केले असल्याने, त्यांनी शासनाने विहित केलेली संगणक अर्हता पूर्ण केलेली आहे, असे समजण्यात येईल.

५) परिवीक्षाधीन उमेदवारास परिविक्षा कालावधीमध्ये कोणतीही वेतनवाढ अनुज्ञेय असणार नाही. ज्यावेळी त्याने परिविक्षा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केल्यामुळे त्यांचे परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्याचे आदेश निर्गमित होतील त्यानंतर संबंधित परिविक्षाधीन उमेदवार वेतनवाढ मिळण्यास पात्र होईल. तसेच तो परिविक्षाधीन नसता तर, त्याला जे वेतन मिळाले असते असे वेतन व आनुषंगिक थकबाकी देण्यात येईल.

६) मात्र परिविक्षा कालावधीत शिस्तभंगाची कार्यवाही सुरू असल्यास, अशा प्रकरणी शिस्तभंगाच्या कार्यवाहीअंती, परिविक्षाधीन उमेदवार निर्दोष असल्याचे सिध्द झाल्यास, तो परिविक्षाधीन नसता तर, त्याला जे वेतन मिळाले असते ते वेतन व आनुषांगिक थकबाकी देण्यात येईल. तथापि, शिस्तभंगाच्या कार्यवाहीअंती परिविक्षाधीन उमेदवार

दोषी असल्याचे सिध्द झाल्यास व त्यास सेवा समाप्ती अथवा सेवेतून बडतर्फ करणे या व्यतिरिक्त अन्य शिक्षा दिल्यास, तो परिविक्षाधीन नसता तर, ज्याला जे वेतन मिळाले असते असे काल्पनिक वेतन निश्चित करून वेतन देण्यात यावे तथापि त्याअनुषंगाने देय होणारी थकबाकी अनुज्ञेय असणार नाही.

७) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : अंनियो १००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१.१०.२००५ मधील तरतुदीनुसार संबंधित उमेदवारास नविन परिभाषित अंशदान निवृत्तीयोजना लागू ठरेल. त्यांना सध्या अस्तित्वातील असलेली निवृत्तीवेतन योजना [महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४] आणि सध्या अस्तिवातील असेलली भविष्ट निर्वाह निधी योजना लागू ठरणार नाही.

८) महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१ व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सुधारणांच्या अधिनतेने त्यांची सेवाजेष्ठता राहील.

९) उमेदवार सेवेत रूजू झाल्यानंतर सेवेचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्यांना शासनाला किमान एक महीन्याची आगाऊ लेखी सूचना किंवा एक महिन्याचे वेतन देणे आवश्यक राहील. यासंदर्भातील राजीनामा स्विकारण्याचे अधिकार केवळ नियुक्ती प्राधीकारी (शासन) यांना असतील. क्षेत्रीय कार्यालयांनी परस्पर राजीनामा स्विकृत करु नये किंवा मंजूर करु नये. तथापि,राजीनामा दिल्यानंतर पुन्हा राजीनामा मागे घ्यावयाचा असल्यास, त्यांना वित्त विभाग शासन निर्णय, क्रमांक अंनियो२०१९/ प्र.क्र.४७०/ सेवा-४, दिनांक ०९.०५.२०२२ मधील तरतूदी लागू राहतील. मात्र, गैरवर्तणूक, सेवानियमांचा भंग इत्यादी कारणासाठी उमेदवाराची सेवा समाप्त करण्यासाठी सूचना देण्याचे बंधन शासनावर राहणार नाही.

१०) सदर नियुक्ती उमेदवाराने सादर केलेल्या प्रमाणपत्रांच्या सत्यासत्यतेवर अवलंबून राहील. उमेदवाराने सादर केलेली प्रमाणपत्रे तसेच साक्षांकन नमुन्यात नमूद केलेली माहिती, नियुक्तीनंतर खोटे अथवा बनावट आढळल्यास सदर उमेदवाराची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

११) उमेदवार सध्या केंद्र / राज्य शासनाच्या सेवेत अथवा निमशासकीय सेवेत कार्यरत असतील तर संबंधित नियंत्रण अधिकाऱ्यांनी त्यांना नियुक्तीच्या ठिकाणी हजर होणाच्या दृष्टीने सदर सेवेतून कार्यमुक्त झाल्याचे अथवा तसे लेखी पत्र सादर केल्याशिवाय त्यांना रुजु करुन घेता येणार नाही. तसेच, सदर उमेदवाराची नियुक्ती ही त्यांचे केंद्र/ राज्य शासनाच्या सेवेत अथवा निमशासकीय सेवेतील ना-चौकशी प्रमाणपत्र त्यांच्या संबंधित कार्यालयाकडून प्राप्त होण्याच्या अधिन राहील.

१२) हे आदेश प्राप्त होताच उमेदवाराने पदभार ग्रहण करण्यासाठी संचालक (रेशीम), रेशीम संचालनालय, नागपूर यांच्याकडे शासन निर्णयाच्या प्रतीसह प्रत्यक्ष संपर्क साधावा. तसेच उमेदवाराने त्यांच्या पदाचा कार्यभार धारण केल्याबाबतचा अहवाल रेशीम संचालनालयाने तात्काळ शासनास पाठवावा.

१३) महाराष्ट्र राज्य प्रशिक्षण धोरणांसबधी सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दि.२६.०९.२०११ व दि.२२-०६-२०२१ मधील तरतूदीनुसार उमेदवारास आवश्यक ते प्रशिक्षण देण्याची व्यवस्था संचालक (रेशीम) यांनी करावी.

१४) रेशीम संचालनालय (वस्त्रोद्योग विभाग) मधील रेशीम विकास अधिकारी (श्रेणी-१) संवर्गासाठी निश्चित केलेल्या सेवा शर्ती सदर उमेदवार यांना लागू राहतील.

१५) वर नमूद अटी व शर्ती व्यतिरिक्त महाराष्ट्र शासनाच्या अधिकाऱ्यांना लागू असलेले प्रचलित नागरी सेवा विषयक सर्वसाधारण नियम सदर उमेदवारास लागू राहतील.

१६) उमेदवार नियुक्तीवर रूजू होण्यासाठी जो प्रथम प्रवास करेल त्याचा प्रवास भत्ता मिळण्यास ते पात्र नाहीत.

**३.** सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२३१६०४०८५१३६ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by PAWAR TUSHAR PITAMBAR
Date: 2026.07.23 16:09:08 +05'30'

**(डॉ. तुषार पवार)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता ), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
२. महालेखापाल, (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
३. संचालक , लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई. (पत्राने)
५. संचालक (रेशीम), रेशीम संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
८. मा.मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
९. सचिव (वस्त्रोद्योग) यांचे स्वीय सहायक, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय , मुंबई
१०.उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्या-१२/ कार्या-१६ ब) मंत्रालय, मुंबई
११.जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती/सांगली.
१२.सर्व उपसंचालक/ सहायक संचालक, प्रादेशिक रेशीम कार्यालये.
१३.सर्व रेशीम विकास अधिकारी श्रेणी१/ श्रेणी-२, जिल्हा रेशीम कार्यालये.
१४.संबंधित उमेदवार
१५.निवड नस्ती (रेशीम कक्ष)